॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## जनसंपर्क विभाग

**बातमी क्र.१**

जळगाव दि. ११ ( ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या २७ व्या पदवीप्रदान समारंभात ज्या विद्यार्थ्यांना पदवी / पदविका प्रमाणपपत्र घ्यावयाचे आहेत त्यांना दि.२० ऑक्टोबर, २०१८ पर्यंत विलंब शुल्कासह ऑनलाईन अर्ज सादर करण्यासाठी मुदतवाढ देण्यात आली आहे.

विद्यापीठातर्फे मार्च/एप्रिल/मे, २०१८ व त्यापूर्वी घेण्यात आलेल्या परीक्षांमध्ये जे विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत अशा सर्व विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्रासाठी विलंब शुल्कासह ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी अंतिम मुदत १० ऑक्टोबर, २०१८ पर्यंत देण्यात आली होती. मात्र, विद्यार्थ्यांनी पुनश्च मुदतवाढीची मागणी केली असल्यामुळे विलंब शुल्कासह ऑनलाईन अर्ज सादर करण्यासाठी दि. ११ ऑक्टोबर ते २० ऑक्टोबर, २०१८ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली असून विलंब शुल्क रु.१०० आहे. ऑनलाईन अर्ज विद्यापीठाच्या www.nmu.ac.in या संकेतस्थळावर Quick Links मध्ये Online Application for Degree Certificate या Link वर उपलब्ध असल्याचे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक डॉ.ए.बी.चौधरी यांनी कळविले आहे.

---

**बातमी क्र.२**

जळगाव दि.११ ( ) : राज्य शासनाच्या महाराष्ट्र स्टेट इनोव्हेशन सोसायटीच्या वतीने महाराष्ट्रातील नवउद्योजक, विद्यार्थी आणि स्टार्टअप यांना कल्पना मांडण्यासाठी काढण्यात आलेल्या महाराष्ट्र स्टार्टअप अंतर्गत शनिवार, दि. १३ ऑक्टोबर रोजी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात दिवसभराची कार्यशाळा (बूटकॅम्प) आयोजित करण्यात आली आहे.

महाराष्ट्रातील तरुणांच्या नवउद्योजकीय संकल्पनाद्वारे नवीन उद्योग सुरु व्हावेत व हे तरुण आत्मनिर्भर व्हावेत यासाठी महाराष्ट्र स्टार्टअप यात्रा काढण्यात आली आहे. ४ ऑक्टोबर पासून यात्रेला प्रारंभ झाला असून ३ नोव्हेंबरला नागपूर येथे या यात्रेची सांगता होणार आहे. जळगाव येथे कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात या यात्रेचा बूटकॅम्प होणार आहे. १३ ऑक्टोबर रोजी सिनेट सभागृहात होणाऱ्या या कार्यशाळेत विद्यापीठाशी संलग्न आजी-माजी विद्यार्थी तसेच नाविन्यपूर्ण कल्पना असणारे नागरिक देखील सहभागी होऊ शकतील. नवीन उद्योग उभारणीच्या त्यांच्या नाविन्यपूर्ण कल्पना या कार्यशाळेत त्यांना मांडता येणार आहेत. ज्या कल्पना अत्यंत नाविन्यपूर्ण असतील त्यासाठी स्वतंत्र चर्चा देखील केली जाणार आहे. उद्योग उभारणीची सविस्तर माहिती, कर्ज याबाबत तज्ज्ञांकडून मार्गदर्शन केले जाणार आहे. ज्या विद्यार्थ्यांना उद्योगाबाबत नाविन्यपूर्ण कल्पना मांडायच्या आहेत त्यांनी विद्यापीठाच्या www.nmu.ac.in या संकेतस्थळावर नोंदणी करावी अथवा प्रा.भूषण चौधरी (मो.नं.९८२३४ ५२५३९), प्रा.विकास गीते (मो.नं.९४२०० ६७३२१) यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन विद्यापीठाच्या वतीने करण्यात आले आहे

---

जा.क्र. : उमवि/16/हस्तदेय /2018 दिनांक : 11 ऑक्टोबर,2018

प्रति,

मा. संपादक / प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकातून प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,
स्वाक्षरीत प्रत/-
(डॉ.सुनील पाटील )
जनसंपर्क अधिकारी

## जनसंपर्क विभाग

जळगाव दि.11 ( ) राष्ट्रीय शिक्षण हक्क कायदयातंर्गत प्राथमिक स्तरावरील खासगी शाळांमध्ये गरीब कुटुंबातील मुलांसाठी 25 टक्के जागा आरक्षित ठेवण्याची प्रभावी अंमलबजावणी व जनजागृती व्हावी या उद्देशाने कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव आणि तपस्या प्रतिष्ठान यांच्यात गुरुवारी सामंजस्य करार करण्यात आला.

राष्ट्रीय शिक्षण हक्क कायदयातील 12.1 कलमातंर्गत 6 ते 14 वर्ष वयोगटातील बालकांसाठी शिक्षण हा मुलभूत हक्क असल्याचे मान्य करण्यात आले असून सर्व खासगी प्राथमिक शाळांमध्ये गरीब कुटुंबातील मुलासाठी 25 टक्के जागा आरक्षित ठेवणे बंधनकारक आहे. मात्र याची अजुनही प्रभावी अंमलबजावणी केली जात नाही. अजिम प्रेमजी फौउंडेशनने या कायदयाचे अंमलबजावणीसाठी देशभरातील काही राज्य दत्तक घेतले आहेत. यामध्ये महाराष्ट्राचा देखील समावेश असून जळगाव आणि नंदुरबार या दोन जिल्हयांची जबाबदारी तपस्या प्रतिष्ठान, ठाणे यांच्याकडे देण्यात आली आहे. या प्रतिष्ठानच्या वतीने कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाकडे प्रस्ताव देण्यात आला होता. यामध्ये विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयातील काही विद्यार्थ्यांच्या सहकार्याने या कायदयाच्या अंमलबजावणीसाठी जनजागृती करुन एक लाख रुपयाच्या आत वार्षिक उत्पन्न असलेल्या कुटुंबातील विद्यार्थ्यांचा शोध घेवून त्यांना या प्राथमिक शाळांमध्ये प्रवेश घेण्यासाठी प्रवृत्त केले जाणार आहे. त्यासाठी व्यवस्थापन परिषद सदस्य दिलीप पाटील यांच्या अध्यक्षतेखाली प्रा.एस.टी.इंगळे, प्राचार्य लता मोरे, प्रा.विजय लोहार, प्रा.सत्यजित साळवे, प्रा.अविनाश बडगुजर, प्रा.आय.बी.चौधरी यांची समिती कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांनी नियुक्त केली. गुरुवारी तपस्या प्रतिष्ठान आणि विद्यापीठ यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला. यावेळी कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील, कुलसचिव भ.भा.पाटील, श्री.दिलीप पाटील, प्रा.एस.टी.इंगळे, तपस्या प्रतिष्ठानचे मुख्य कार्यकारी तपस सुत्रधार, भरत अंमळकर उपस्थित होते.

---

जा.क्र. : उमवि/16/हस्तदेय /2018 दिनांक : 11 ऑक्टोबर,2018

प्रति,

मा. संपादक / प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकातून प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,
स्वाक्षरीत प्रत/-
(डॉ.सुनील पाटील )
जनसंपर्क अधिकारी